श्रीराम.

तालयोगी आश्रम तथा गुरुकुलाची तपपूर्ती

तालयोगी पद्मश्री पंडित सुरेश तळवलकर यांनी स्वयंस्फूर्तीने गुढीपाडव्याच्या शुभदिनी 4 एप्रिल 2011 रोजी पुणे येथे तालयोगी आश्रम तथा गुरुकुल सुरू केले आणि करवीर पीठाचे शंकराचार्य विद्याशंकर नृसिंह भारती आणि प. पू. विष्णुमहाराज पारनेरकर महाराज यांचे शुभहस्ते गुरुकुलाचे उद्घाटन झाले. आता या गुरुकुलाचा तपपूर्तीचा सोहळा 4 एप्रिल रोजी पुणे येथे विद्यमान शंकराचार्य विद्यानृसिंहभारती आणि विद्यावाचस्पति शंकर अभ्यंकर यांचे उपस्थितीत पार पडणार आहे. त्यानिमित्त आघाडीचे लोकप्रिय तबला वादक श्री. सत्यजित तळवलकर यांचे तबला सोलोवादन आणि पद्मश्री पंडित उल्हास कशाळकर यांचे गायन असा औचित्यपूर्ण कार्यक्रम गुरुकुलातर्फे बालगंधर्व रंगमंदिर पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे.

खरं तर सुरेशदादांचं हे विद्यादानाचे कार्य अनेक वर्षे सुरु आहे. अगदी 1975 सालाचेही अगोदर पासून. त्यांची जडण घडण जेथे झाली त्या गोरेगाव मुक्कामी असताना अनेक कार्यक्रम सांभाळून सतत हे काम रोज अग्निहोत्राप्रमाणे सुरु होतेच. वानगी दाखल आजचे आघाडीचे तबलावादक श्री. विजय घाटे, रामदास पळसुले, सत्यजित तळवलकर  हे त्याच काळात तयार झालेले शिष्य. परंतु एक वेळ अशी आली  की त्यांना आपले कार्यक्रम थोडे आवरते घेऊन जास्त लक्ष  शिकविण्यावर केंद्रित करावेअसे वाटू लागले. त्यातून त्यांनी दीर्घकाळ पर्यंत महिन्यातून काही दिवस मुंबई, पुणे, नाशिक, कोल्हापूर अशा अनेक ठिकाणी कार्यशाळा घेऊन हे काम सुरु केले. पुढे पुण्याला स्वतःच्या फ्लॅट मध्ये छोट्या प्रमाणावर गुरुकुल सदृश असे लहान मुलाना शिकविण्यास सुरवात केली. पुढे डॉ. श्रीनिवास राव या सुरेशदादांच्या शिष्याने धायरीला आपल्या वास्तूत हे गुरुकुल सुरु करावे असा विचार मांडला आणि आग्रहही केला. प्रत्यक्ष कब्जासाठी काही स्थानिक अडचणीना मोठ्या संयमाने दूर करून वास्तू ताब्यात आली. मुख्यतः फिरोज दस्तूर फाऊंडेशन आणि इतरही अनेक दानशूर मंडळींच्या सहयोगाने हे गुरुकुल खऱ्या अर्थाने कार्यरत झाले.

भारतीय संस्कृतीत गुरुकुल ही पूर्वापार  चालत आलेली एक पवित्र अशी शिक्षणाची  परंपरा आहे. ज्ञानी, आचार-विचार संपन्न आणि विद्यादानाची तयारी  असणारा समर्थ गुरु आणि अशा गुरूंच्या मार्गदर्शनाखाली  शिकण्याची तळमळ असणारे विद्यार्थी एकत्र राहतात,  विद्या आणि संस्कार एकाच वेळी शिकविले जातात अशी गुरुकुल या संकल्पनेची व्याप्ती वर्णन करता येईल.  या दोहोंच्या सहवासातून अनेक वर्षांच्या परिश्रमानंतर घडलेले विद्यार्थी जेव्हा विद्यासंपन्न होऊन

एका विशिष्ट दर्जाने समृद्ध होऊनच समाजात मिसळतात ते या समाजाचे आणि देशाचे सांस्कृतिक जीवन अधिक समृद्ध करण्यासाठी खूप मोठा हातभार लावतात यात शंकाच नाही.

गायन, वादन, नृत्य या संगीत कलेच्या प्रांतातील तालयोगी पद्मश्री पंडित सुरेश तळवलकर या आदर्श गुरूंच्या सहवासातील प्रसिद्ध असे पुण्यातील सांस्कृतिक क्षेत्रात मोलाची भर टाकणारे गुरुकुल म्हणजे 'तालयोगी आश्रम' होय. योग्य वयात शिक्षणाचे संस्कार विद्यार्थ्यांवर लवकर आणि परिणामकारक होतात आणि दिलेली विद्या नियमित रियाजाच्या साधनेतून नक्की फलद्रूप होते हे सिद्ध झालेले हे विद्यापीठच आहे. गुरु हा शास्त्र, तंत्र, विद्या आणि कला यात पारंगत असेल आणि विशेषतः गुरु स्वतः नियमित साधनेत रत असेल आणि जर असा आदर्श शिष्यांसमोर असेल तर अर्थातच त्याचा दृश्य परिणाम आपोआप दिसायला लागतो. संस्कार ही गुरूंच्या सहवासातील परावर्तित होणारी गोष्ट आहे हे जितके खरे तितकेच असे संस्कार प्रयत्नाने रुजविता येतात आणि हे सिद्ध करण्याचे कौशल्य असणारे गुरु या गुरुकुलला लाभले हे या गुरुकुलच्या यशाचे गमक म्हणता येईल.

या गुरुकुलात जसे प्रामुख्याने तबला आणि पखवाज यांचे शिक्षण दिले जाते तसेच इतर तालवाद्ये याचीही तालीम विद्यार्थ्यांना मिळते. नृत्याच्या विद्यार्थ्यांना लय-तालाचे शिक्षण दिले जाते. सोलो वादन, गायन-वादन-नृत्याची साथसंगत, पढंत ही सर्व तालीम एकत्रित सुरू असते. संगीताच्या क्षेत्रात सर्वार्थाने शिष्य घडविण्याचे कठीण काम या गुरुकुलात होते. प्रत्येक विषय संपूर्ण उलगडून शिकविला गेला तर त्यात त्रुटी राहण्याची शक्यता फार कमी असते ही गोष्ट या गुरुकुलातून बाहेर पडलेल्या कलाकारांचे एकल वादन व साथसंगत यातून ठळकपणे दिसून येत आहे. अर्थात हा अनुभव प्रत्येक वेळी त्या त्या कलाकाराला अधिक समृद्ध करीत असतो. याचा वस्तुपाठ विद्यार्थ्यांना गुरुकुलातर्फे नियमित आयोजित मैफिलीतून प्रत्यक्षपणे मिळत असतो.

तालयोगी आश्रमात विद्यार्थी घडविण्याची प्रक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला तर ही शिक्षण पद्धती पाहून अचंबित व्हायला होते. प्राथमिक स्तरावर जशी गायनात स्वर साधना तशी तबला विषयात अक्षर साधना करून घेतली जाते. खरे तर ही तशी कंटाळवाणी वाटणारी परंतु अत्यावश्यक अशी पायरी आहे. इथे जो टिकला त्याचा पुढला प्रवास वेगाने होण्याची शक्यता जास्त. मोठ्याने वाजवणे आणि वजनदार वाजविणे यातील फरक, काही रियाज कमी लयीत करणे, उच्चारण स्वच्छ आणि कुठे आघात असावा याची तालीम, रियाजाच्या वेळी स्वराचा तानपुरा सुरू असणे अशा अनेक गोष्टी एकावेळी होत असतात आणि ही तंत्रावर हुकमत मिळविण्यासाठीची पायाभरणी पुढे किती महत्त्वाची आहे याचे प्रत्यंतर पुढील वाटचालीत विद्यार्थ्यांना आपोआप येते सुरवातीला कंटाळवाण्या वाटणाऱ्या रियाजची गोडी लागण्याचे इंगित यात दडलेले दिसते.

इथे चूक किंवा बरोबर काय या पेक्षा योग्य आणि अयोग्य काय हे समजावून दिले जाते. गुरु स्वतः तासनतास शिष्यांबरोबर रियाज करतात. नियमितपणे दिवसातील आठ ते दहा तास गुरुशिष्यांचा एकमेकांसमवेत सहवास असतो. कलाकारी ही बऱ्याच अंशी आत्मविश्वास वाढविणाऱ्या तंत्राशी निगडित असली तरी शास्त्र पक्के असेल तर प्राप्त झालेल्या विदयेला एक निराळेच तेज येते आणि ती सादरीकरणाच्या वेळी लकाकून बाहेर पडते हे या गुरुकुलातून शिकलेल्या विद्यार्थ्यांच्या वादनातून दिसून येते.

तंत्र पक्के असेल तर उपज निर्मितीला अडथळा येत नाही आणि शास्त्राधिष्ठित विद्या ही दर्जेदार उपज निर्माण करण्याची क्षमता निर्माण करते. हे सर्व या गुरुकुलात रोज घडत असते. संगीतात उपज निर्मिती क्षमता ही त्या कलाकाराची ओळख बनते. नावीन्य किंवा नवता नसेल तर परंपरेने चालत आलेल्यातही चैतन्याचा अभाव दिसून येतो. उपज अंगाने आयत्यावेळी प्रसवलेला नवीन विचार श्रोत्यांना आनंद देऊन जातोच परंतु त्या कलाकाराला सांगीतिक दृष्टीने अधिक समृद्ध करीत असतो. ही सर्व रोजच्या तालमीतून आपोआप घडत असते.

दाक्षिणात्य लयकारीचा प्रभाव उत्तर हिंदुस्तानी सांगीतिक प्रवाहावर नेहमीच वरचढ होत असल्याने त्याची खंत काही कलाकारांना अस्वस्थ करत असल्याचे दिसून येते. परंतु तालयोगी आश्रमातील विद्यार्थ्यांच्या तालमीत अशा सूक्ष्म लयकारीचे अत्यंत शास्त्रशुद्ध आणि सूत्रबद्ध शिक्षण दिले गेल्याने निरनिराळ्या मात्रांचे गणित सोपे होऊन जाते आणि मग अर्थातच त्याचा प्रभाव सोलोवादनातून आणि साथसंगतीत प्रकर्षाने दिसून येतो.

‘या हृदयीचे त्या हृदयी घातले’ हे संत श्री ज्ञानेश्वर माऊलींचे बोल म्हणजे नक्की काय हे या गुरुकुलात गुरु शिकवीत असताना प्रत्यक्ष पाहिले आणि ऐकले तर अनेक शिष्यांना एकाच वेळी नजरेतून आणि देहबोलीतून कसे संक्रमित करतात ही उमगेल. आणि असे दुर्मिळ क्षण कधीतरी अनुभवता आले तर या गुरुकुलाचे समर्थ गुरु पंडित सुरेश तळवलकर या बहुआयामी व्यक्तिमत्व असलेल्या कलाकाराची अनेक शिष्य मंडळी तुलनेने कमी वेळात एवढी कशी काय तयार होतात आणि ही सर्व साध्य करू शकतात याचे रहस्य उलगडायला नक्की मदत होईल.

विद्यार्थी गुरूंच्या सहवासात असताना गुरूंच्या वागण्या- बोलण्याच्या आणि कृती-उक्तीच्या तसेच सांगीतिक विचार समृद्धीच्या प्रवाहात आपोआप होणारे अदृश्य रूपातील संस्कार पुढे आपोआप दृश्य रूपात दिसायला लागतात. कलाकाराची ‘उपज’ करण्याची शक्ति आणि विद्या प्राप्तीनंतर येणारी ‘नजर’ या दोन्ही गोष्टी संगीतात त्या त्या कलाकाराचे आपले असे एक वैशिष्ट्य अधोरेखित करीत असतात. तर अशा स्वरूपाच्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगाने जडणघडणीचे महाकठीण काम पंडित सुरेश तळवलकर यांनी आपल्या कलोपासनेसोबत अंगिकारले आहे आणि

असे अनेक शिष्य आज सांगीतिक जगतात यशस्वीपणे आणि एका विशिष्ट दर्जाने वावरताना दिसत आहेत ही गोष्ट इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद घ्यावी लागेल यात शंकाच नाही.
उत्तरोत्तर यात आणखीन भर पडून हे तालयोगी गुरुकुल कलावैभवा च्या शिखरावर पोहोचावे आणि अशी गुरुकुलाची परंपरा या गुरुकुलातून बाहेर पडणाऱ्या शिष्यांनीही आपापल्या परीने जोपासवी अशी शुभेच्छा.

हा तपपूर्ती महोत्सव आणखी एका कारणाने महत्वाचा ठरतोय ते म्हणजे या गुरुकुलचे आचार्य व गुरु पं सुरेशजी तळवलकर यांच्या आयुष्यातील हे अमृत महोत्सवी वर्ष. ताल योगी उपाधी यथार्थपणे सिध्द करणारे, गायन-वादन आणि नृत्य या संगीत क्षेत्रातील सर्वांचे आदर्श असे सुरेशदादाना सर्वांतर्फे अभिष्ट चिंतन करूया आणि 'जिवेत शरदः शतम' अशी श्री ईश्वरप्रती प्रार्थना.

मुकुंद आठवले.